## नियमित दरखास्त क्र.०२/२०१८ मधील निशाणी १ वरील आदेश

१. दरखास्तदार यांनी ही दरखास्त नियमित दिवाणी दावा क्र.७९/१९९९ मधील दिनांक २८.०७.२००६ रोजीचे हुकूमनाम्यानुसार जे.डी. (मूळ प्रतिवादी क्र.१) यांचेकडून दावा मिळकत मौजे साळींबा, ता.वडवणी, जि.बीड येथील गट नं.१७७ पैकी उत्तर बाजूच्या अतिक्रमित ७ आर जमिनीचा प्रत्यक्ष व खुला कब्जा मिळणेसाठी दाखल केली आहे.

२. जे.डी. यांनी निशाणी १० वर म्हणणे दाखल करून दरखास्त अर्जास हरकत घेतली आहे.

३. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली. दरखास्तदारतर्फे विधीज्ञ श्री.एस.पी.डोंबाळे व जे.डी. तर्फे विधीज्ञ श्री.पी.के.तिडके यांचा युक्तिवाद ऐकला.

४. अभिलेखातील निशाणी ११ वरील नियमित दिवाणी दावा क्र.७९/१९९९ मधील न्यायनिर्णय व निशाणी १२ वरील हुकूमनामा यांचे अवलोकन केले असता प्रतिवादी यांना हुकूमनाम्याच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत दावा कलम १ मध्ये नमूद चतुःसिमेतील वादातील ६ आर व ७ आर जमिनीचा कब्जा वादी यांना देणेबाबत आदेश झाला आहे, असे दिसून येते. दरखास्तदार यांनी या कामी त्या हुकूमनाम्यानुसार ७ आर क्षेत्राचा जे.डी. (मूळ प्रतिवादी क्र.१) यांचेकडून कब्जा मिळणेबाबत मागणी केली आहे. जे.डी. यांनी त्यांचे निशाणी १० वरील म्हणण्यामध्ये दरखास्तदार (मूळ वादी) यांनी गट नं.११५ मधील सह–हिस्सेदार यांना पक्षकार केलेले नाही व दावा मिळकतीच्या चतुःसिमा चुकीच्या आहेत, अशा हरकती घेतल्या आहेत. परंतु, जे.डी. (मूळ प्रतिवादी क्र.१) हे दाव्याचे कामी हजर झालेले नव्हते व त्यांनी दाव्याचे कामी कैफियत मांडलेली नव्हती. त्यामुळे, जे.डी. यांना या दरखास्त अर्जाचे कामी या हरकती उपस्थित करता येणार नाहीत.

५. जे.डी. यांनी त्यांचे म्हणण्यामध्ये दरखास्तदार यांनी दाव्यातील प्रतिवादी क्र.२ यांना पक्षकार केले नसल्याबाबत हरकत घेतली आहे. परंतु,

दरखास्तदार यांचे दरखास्त अर्जातील कथनांप्रमाणे प्रतिवादी क्र.२ यांनी त्यांचे ताब्यातील जमिनीचा हुकूमनाम्यानुसार वादी यांना कब्जा दिला आहे. त्यामुळे, जे.डी. यांनी घेतलेल्या या हरकतीमध्ये तथ्य दिसून येत नाही.

६. जे.डी. यांनी त्यांचे म्हणण्यामध्ये दरखास्त अर्ज मुदतीत दाखल केलेला नाही, अशी हरकत घेतली आहे. परंतु, नियमित दिवाणी दावा क्र.७९/१९९९ मधील हुकूमनामा हा दिनांक २८.०६.२००६ रोजी झाला असून दरखास्तदार यांनी ही दरखास्त दिनांक ०७.०६.२०१८ रोजी दाखल केली आहे. मुदतीचा कायदा, १९६३ चे आर्टिकल १३६ नुसार दरखास्तदार यांनी ही दरखास्त १२ वर्षांचे मुदतीत दाखल केली आहे. त्यामुळे, जे.डी. यांनी उपस्थित केलेल्या हरकतीमध्ये कोणतेही तथ्य नाही.

७. नियमित दिवाणी दावा क्र.७९/१९९९ मधील दिनांक २८.०७.२००६ रोजीचे हुकूमनाम्यानुसार जे.डी. (मूळ प्रतिवादी क्र.१) यांनी हुकूमनाम्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत वादातील ७ आर जमिनीचा कब्जा दरखास्तदार यांना दिलेला नाही, असे अभिलेखातील कागदपत्रांवरून दिसून येते. दरखास्तदार यांनी निशाणी ९ वर शपथपत्र सादर करून नियमित दिवाणी दावा क्र.७९/१९९९ मधील दिनांक २८.०७.२००६ रोजीचे न्यायनिर्णय व हुकूमनाम्याविरूध्द कोणतेही अपील प्रलंबित नसल्याबाबत कथन केले आहे. त्यामुळे, दरखास्तदार यांना या हुकूमनाम्यानुसार वादातील ७ आर क्षेत्राच्या जमिनीचा जे.डी. यांच्याकडून कब्जा मिळणेसाठी कब्जे वॉरंट काढणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक व जरूरीचे आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहेः–

## आ दे श

१. मौजे साळींबा, ता.वडवणी जि.बीड येथील गट नं.१७७ पैकी उत्तर बाजूच्या अतिक्रमित ७ आर जमिनीचा दरखास्तदार यांना प्रत्यक्ष व खुला कब्जा मिळणेसाठी

जे.डी. यांचेविरूध्द कब्जे वॉरंट काढण्यात यावे. पुढील नेमली तारीख दिनांक १६.०९.२०२३ रोजीची राहील.

–

Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2023.08.02 11:56:55 +0530

**दिनांक : ०१.०८.२०२३** **(डी.एम.हिंग्लजकर)**

**ठिकाण : वडवणी** **दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, वडवणी,**

**ता.वडवणी,जि.बीड**

**Certificate**

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/order.

Sd/-
(Amol D. Mule)
Stenographer (Grade-3)
Civil Court Junior Division
Wadwani

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 01.08.2023 |
| Transcribed on | : | 01.08.2023 |
| Checked and signed on | : | 02.08.2023 |